# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २८/०४/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील सिर्सी शेत शिवार येथे दिनांक दि. २५/०४/२२ चे १०.१५ वा. ते १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ वंदना अशोक वरभे, वय ५० वर्ष, रा. सिर्सी त. उमरेड व आरोपी १) सौ. मंदा भयाजी वरभे, २) मंगेश वरभे व ३) पल्लवी वरभे तिन्ही रा. सिर्सी त उमरेड यांच्या मध्ये शेतीच्या हिस्सेवाटणी वरून भांडण होउन आरोपीने फिर्यादीस धक्काबुक्की करून हात मुरगडला. फिर्यादी हिला ग्रामीण रूग्णालयामधुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले होते. कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नपोशी ठाकरे मो.नं. ९२८४८६५३६६ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील काटोल ते सावरगाव रोड पावर हाउस काटोल येथे दिनांक २६/०४/२०२२ चे २३.०० वा. ते २३.३० वा. सुमारास अनोळखी व्यक्ती (मृतक) रोडवर पायदळ जात असता, एम.एच– ४०/सीबी– ४८०४ क्रमांकाच्या पल्सर मोटारसायकल चा चालक आरोपीने नामे– रूपेश नत्थुजी मुरोडिया रा. गोन्ही हा त्याचे मोटरसायकलवर त्याची पत्नीला डबलसीट बसवून मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून रोडने पायदळ जाणारा अनोळखी इसमास धडक दिली. या अपघातात आरेपी हा अनोळखी इसमाचे मरणास तसेच स्वत:चे व सौ. सुरेखा मुरोडिया हिचे जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार बाळकृष्ण उईके पो.स्टे काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अविनाश बहेकर मो.क्रं. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मिलन चौक चनकापुर येथे दिनांक २६/०४/२०२२ चे २१.४५ वा. ते २२.०० वा. सुमारास एमएच– ४०/एव्ही–९४८४ क्रमांकाचा चालक/आरोपी नामे– विलास शेषराव धोटे (मृतक) वय ३३ वर्ष, रा. मगरपुर ता.काटोल हा ट्रिपलसिट मोटरसायकलने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोर उभे असलेल्या एमएच– ४०/सीए– १०७७ क्रमांकाचा फोर व्हीलर गाडीचा चालकाला मागुन धडक दिली. या अपघातात आरोपी खाली पडल्याने तो गंभीर जखमी होवुन स्वताहाचे मरणास कारणीभुत ठरला. तसेच आरोपी सोबतचा नामे– राहुल दिलीप धोटे वय २३ वर्ष व अशोक दयाराम अवझे वय ४५ वर्ष दोन्ही रा.चिखली मालोदे ता.काटोल यांना जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार सुर्यभान जळते पो.स्टे खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो.नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

## अपघातात जखमी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा मकरधोकडा शिवार उमरेड ते बुटीबोरी रोड ता.उमरेड जि.नागपूर येथे दिनांक दि. २८/०४/२०२२ चे ०९.३० वा. सुमारास एमएच –३१/सीक्यु–१७८७ क्रमांकाचा ट्रॅव्हल्सचा चालक आरोपी नामे– दत्तात्रय हरीभाउ खंगार रा.रायपूर ता.हिंगणा नागपूर हा लग्नाची वरात घेवुन जात बुटीबोरी ते उमरेड मार्गे मौज वणी नांद ता.भिवापूर जि. नागपूर येथे जात असतांना त्याने आपल्या ताब्यातील ट्रॅव्हल्स ही हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवुन ट्रॅव्हल्सचे समोरील डाव्या बाजुचे चाक फुटल्याने ड्रायव्हर आरोपी याचा स्टेंरीग वरून संतुलन बिघडल्याने ट्रॅव्हल्स रस्त्याचे डाव्या बाजुला उलटली. या अपघातात ट्रॅव्हल्स मधील महिला क्र. १) बिदाबाई गोविंदराव भोजने रा.कटंगझरा, २) सौ पुजा हिरामन जांभुळे रा. खिंडसी, ३) मंगला लिलाधर श्रीरामे रा. हिंगणा, ४) सविता चंद्रशेखर रनदिवे व ५) मनिषा शुभम गुढदे रा.माहुरझरी व ईतर १० ते १२ महीला यांना गंभीर जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला आहे. तेथे जखमींवर प्राथमीक उपचार करुन गंभीर जखमी असलेले १३ प्रवाशांना स्वामी विवेकानंद हॉस्पीटल खापरी नागपूर येथे पुढील उपचाराकरीता रेफर केले असुन ईतर किरकोळ जखमी प्रवाशांवर प्रा.आ.केंद मकरधोकडा येथे उपचाकर केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश आजबराव नारनवरे वय २९ वर्ष रा.मांडवा मारवाडी ता.हिंगणा जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८ भादवी सह कलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो. नं ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कुही :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा सिंधी शेतशिवार येथे दिनांक १५/०४/२२ चे १५.०० वा. पुर्वी **मंगेश राजुजी मस्के (मृतक), वय २७ वर्ष रा. सिंधी ता.कुही जि.नागपुर** हा दारू पिण्याचे सवयीचा असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातीत मृतक हा सकाळी ०६.०० वा.दरम्यान रूषी सोनसरे याचे शेतात काम करण्याकरीता गेला त्यांनतर दुपारी ०३.०० वा. दरम्यान गावातील अमीत सोनसरे याने मृतकचे वडीलाना फोन करून सांगीतले की, मंगेश हा अरूण राघोते याचे शेतात निंबाचे झाडाखाली झोपला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजु सदाशिव मस्के, वय ५१ वर्ष, रा. सिंधी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील पोलिस नाईक ग्यानीवंत गुरपुडे मो.नं ९५५२५३१००२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा कळंबी शेतशिवार येथे दिनांक २७/०४/२२ चे १५.०० वा. पुर्वी **मनोहर भिमराव बोबडे (मृतक), वय ४९ वर्ष रा. कळंबी** हा अती दारूचे सेवन केल्याने मरण पावलेल्या स्थितीत दिसून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मारोतीराव भिमराव बोबडे, वय ४० वर्ष, रा. कळंबी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील सहायक फौजदार हिवरकर मो.नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. रामटेक :—** अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा कळंबी शेतशिवार येथे दिनांक २७/०४/२२ चे १३.०० वा. सुमारास **मंगेश हरीचंद्र खंडाळे (मृतक), वय ५४ वर्ष, रा. आंधळगाव ता. मोहाडी जि. भंडारा** हा दारू पिण्याच्या सवईचा असुन तो दारूच्या नशेत फिरत असता पाणी न मिळाल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुरेश शंकर खडसे, वय ४६ वर्ष, रा. शनिवारी वार्ड रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील पोलिस हवालदार राजेंद्र अडामे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**